धारावी पुनर्विकास प्रकल्प
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दूरध्वनी : ०२२-६६४०५५५६
Email : drpsra@gmail.com

जा.क्र.झोपुप्रा/धापुप्र/उजि/न.क्र.३१८/ २७७ /२०२४
दिनांक : ११.०३.२०२४

## धारावी पुनर्विकास प्रकल्प

## जाहीर सूचना

### झोपडीधारकांचे सर्वेक्षण

सदर सूचनेद्वारे जाहीर करण्यात येते की, धारावी अधिसूचित क्षेत्रांतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पासंबंधीत झोपडीधारकांची पात्रता तपासण्यासाठी घरोघरी (Door to door) सर्वेक्षण दिनांक १८.०३.२०२४ पासून सुरु करावयाचे आहे. याची सुरुवात मध्य / पश्चिम रेल्वे जमिनीलगत माटुंगा (पूर्व) भागातील कमला रामण नगर येथून होणार असून त्यानंतर उर्वरित धारावी अधिसूचित क्षेत्रातील सर्वेक्षण करण्यात येईल. सदर सर्वेक्षण धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेमार्फत धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा.लि. द्वारा करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाची सुरुवात प्रत्येक झोपडीला अनुक्रमांक टाकून करण्यात येईल. सदर सर्वेक्षण बायोमेट्रीक असून सर्वेक्षणादरम्यान झोपडीच्या चटई क्षेत्राचे व्हिडिओ चित्रीकरण झोपडीधारकासमक्ष करण्यात येईल, तसेच झोपडीधारकांचा पती-पत्नीसह फोटो काढण्यात येईल. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/ १४/झोपसु-१, दिनांक १६.०५.२०१५ व शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/ २०१८/झोपसु-१, दिनांक १६.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार पात्रतेसंबंधी नमूद कागदपत्रांची छायांकित प्रत स्वसाक्षांकित करुन झोपडीधारकांनी तयार ठेवावीत व मूळ कागदपत्रे सर्वेक्षण करणाऱ्या पथकाला दाखवावीत, सर्वेक्षण झाल्यानंतर मूळ कागदपत्रे परत करण्यात येतील. सदर शासन निर्णयात नमूद स्वयंघोषणापत्र झोपडीधारकांकडून भरुन घेण्यात येतील. तरी झोपडीधारकांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे ही विनंती.

(मा. मुकाअ तथा विकाअ, धापुप्र यांच्या मान्यतेने)

दिनांक : ११.०३.२०२४

उपजिल्हाधिकारी तथा
सक्षम प्राधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी
धारावी पुनर्विकास प्रकल्प